अखेरच्या क्षणापर्यंत 'एबी फॉर्म'साठी धाकधूक

उमेदवार, समर्थकांची घालमेल

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : महापालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांकडे 'एबी फॉर्म'न देता थेट निवडणूक अधिकाऱ्यांकडे जमा करण्याचे धोरण अवलंबले. शिवाय शेवटच्या क्षणी हे 'एबी फॉर्म' जमा करण्यात आले. त्यामुळे अनेक ठिकाणी उमेदवार व त्यांच्या समर्थकांची चांगलीच घालमेल झाली होती. 'एबी फॉर्म' प्रत्यक्षात मिळतो की नाही, मिळाला तर वेळेवर दाखल करता येईल की नाही, अशी धाकधूक निर्माण झाली होती. ज्यांनी आपल्याला उमेदवारी मिळणारच, असा दावा केला होता, अशा अनेकांच्या पदरी निराशा पडली.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज मंगळवारी अखेरचा दिवस होता. दुपारी ३ पर्यंत अर्ज दाखल करता येणार होते. अर्ज यापूर्वी कधीही दाखल केला असला तरी एबी फॉर्म दाखल करण्याची आज अखेरची मुदत होती. शिवसेनेचे (शिंदे गट) काही उमेदवार वगळता इतर कोणत्याच राजकीय पक्षांनी काल, सोमवारपर्यंत उमेदवारांना एबी फॉर्म दिलेले नव्हते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक कार्यालयात झुंबड उडाली होती. मात्र, कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही उमेदवारांकडे दुपारी २ पर्यंत 'एबी फॉर्म' उपलब्ध झालेले नव्हते.

पूर्वानुभव लक्षात घेऊन राजकीय पक्षाच्या नेत्यांनीच ही खबरदारी घेतली होती. मात्र, त्यातून उमेदवारांची दमछाक झाली. एबी फॉर्म उपलब्ध होत नसल्याने उमेदवारांनी दुपारी १२ पासूनच नेत्यांशी संपर्क करणे सुरू केले होते. नेत्यांच्या सूचनेनुसार त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, परंतु तो विना 'एबी फॉर्म'. शिवसेनेचे (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी उमेदवारांना 'एबी फॉर्म' निवडणूक कार्यालयात आणून दिले. अनेक एबी फॉर्मवर खडाखोड झालेली होती. त्यामुळे याबाबत काय कायदेशीर उपाययोजना करता येईल, याबाबत उहापोह केला जात होता.

भाजप व राष्ट्रवादी युतीचे 'एबी फॉर्म' माजी खासदार सुजय विखे व आमदार संग्राम जगताप यांचे विश्वासू कार्यकर्ते वितरित करीत होते. उमेदवारांना थेट निवडणूक कार्यालयात 'एबी फॉर्म' आणून देत होते, मात्र अखेरच्या क्षणी. काँग्रेसकडूनही अशीच खबरदारी शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण व ठाकरे गटाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी घेतली.

भाजपकडून काही ठरावीक उमेदवारांना दूरध्वनी करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सांगितले जात होते. असाच प्रकार अजित पवार गटाचा सुरू होता. त्यामुळे भाजपमधील अनेक निष्ठावंतांच्या पदरी निराशा पडली. पक्षाची उमेदवारी आपल्याला मिळत नाही, असे पाहून अनेक उमेदवारांनी दुपारी दोननंतर निवडणूक कार्यालयातून काढता पाय घेतला. मात्र, त्यांना आपली निराशा लपवता आली नाही. मात्र, पक्षाच्या नेत्यांबद्दल संताप व्यक्त केला जात होता.

समर्थकांच्या गर्दीने वाहतूक कोंडी

आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सहाही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या परिसरास जत्रेचे स्वरूप आले होते. उमेदवारांसह यांचे समर्थक व नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. यामुळे कार्यालयांबाहेर रस्त्यांवर वेडीवाकडी वाहने उभी करण्यात आल्याने वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सहा ठिकाणी निवडणूक कार्यालय होती या सर्व कार्यालयाच्या आवारात मोठी गर्दी झाली होती. केवळ उमेदवार, त्यांचे सुचक, अनुमोदक या तिघांना सोडले जात होते. मात्र, परिसरात समर्थक व नातेवाईकांसह कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. या गर्दीवर नियंत्रण करणे पोलिसांना अशक्य झाले होते. अर्ज दाखल करताना एका उमेदवाराला किमान एक तास लागत होता. तोपर्यंत वाहतुकीची कोंडी वाढतच गेली.

भाजप-राष्ट्रवादीकडून १२ माजी नगरसेवकांना नकार

६६ जागांवर उमेदवार, दोन ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : महापालिका निवडणुकीसाठी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या युतीने ६६ उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. यात प्रभाग १ व ११ या दोन प्रभागांमध्ये दोन जागांवर मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता आहे. दरम्यान, भाजपने ६ विद्यमानांना उमेदवारी नाकारली आहे. तर, काही जुन्या पदाधिकाऱ्यांनी इतर पक्षांकडून उमेदवारी करत बंडाचे निशाण फडकावले आहे.

महायुतीत फूट पडल्यानंतर शिवसेना (शिंदे गट) स्वबळावर रिंगणात उतरली आहे. तर, भाजप व राष्ट्रवादी युतीने ६६ उमेदवार रिंगणात उभे केले आहेत. यातही ठाकरे शिवसेनेतून माजी महापौर भगवान फुलसौंदर यांच्या पत्नीने राष्ट्रवादीकडून, तर अमोल येवले व विजय पठारे या दोघा नगरसेवकांनी ऐनवेळी भाजपकडून उमेदवारीअर्ज दाखल केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने ११ विद्यमान सदस्यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. भाजपकडून १४ विद्यमान सदस्य रिंगणात आहेत. यात राष्ट्रवादी, भाजप व शिवसेनेतून आलेल्या सदस्यांचाही समावेश आहे.

शीतल जगताप, विनीत पाऊलबुधे व मीना चव्हाण यांनी निवडणुकीतून माघार घेतली. तर, नजीर शेख व रुपाली पारगे यांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. सुनील त्र्यंबके यांच्या सुनेला भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे, तर समद खान यांनी यापूर्वीच पक्ष सोडला आहे. भाजपकडून पल्लवी जाधव, रवींद्र बारस्कर, सोनाली चितळे, राहुल कांबळे, गौरी नन्नावरे, लता शेळके या सहा विद्यमान सदस्यांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. मुस्लिमबहुल प्रभागात दोन्ही पक्षांनी उमेदवारी देण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

भाजपचे ३२ उमेदवार

प्रभाग १- (ब) शारदा दिगंबर ढवण, प्रभाग २- (अ) रोशनी प्रवीण भोसले उर्फ त्र्यंबके, (ड) निखिल बाबासाहेब वारे, प्रभाग ३- (अ) उषा शिवाजीराव नलावडे, (ड) ऋग्वेद महेंद्र गंधे, प्रभाग ५- (ब) धनंजय कृष्णा जाधव, प्रभाग ६- (अ) मनोज लक्ष्मण दुल्लम, (ब) सोनाबाई तायगा शिंदे, (क) सुनीता श्रीकृष्ण कुलकर्णी, (ड) करण उदय कराळे, प्रभाग ७- (अ) वर्षा रोहन सानप, (ब) पुष्पा अनिल बोरुडे, (क) वंदना विलास ताठे, (ड) बाबासाहेब सोन्याबापू वाकळे, प्रभाग ८- (ब) आशा लोभाजी कातोरे, प्रभाग ९- (ब) पद्मा विजयकुमार बोरुडे, (ड) महेश राम लोंढे, प्रभाग १०- (अ) महेंद्र दत्तात्रय बिज्जा, (ब) शीतल अजय ढोणे, (क) मयूरी सुशांत जाधव, (ड) सागर राजू मुर्तडकर, प्रभाग ११- (अ) विकास किशोर वाघ, (ब) दीप्ती सुवेंद्र गांधी, (ड) सुभाष सोपानराव लोंढे, प्रभाग १२- (क) अमोल सुरेश निस्ताने, (ड) शुभ्रा पुष्कर तांबोळी, प्रभाग १५- (ब) दत्तात्रय सोमनाथ गाडळकर, (ड) सुजय अनिल मोहिते, प्रभाग १६- (क) विजय मोहन पठारे, (ड) ज्ञानेश्वर शिवाजी येवले, प्रभाग १७- (क) कमल जालिंदर कोतकर, (ड) मनोज शंकर कोतकर.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ३४ उमेदवार

प्रभाग १- (अ) डॉ. सागर अर्जुन बोरुडे, (ब) ज्योती सतीश ढवण, (क) दीपाली नितीन बारस्कर, (ड) संपत विजय बारस्कर, प्रभाग २- (ब) महेश रघुनाथ तवले, (क) संध्या बाळासाहेब पवार, प्रभाग ३ (ब) गौरी अजिंक्य बोरकर, (क) ज्योती अमोल गाडे, प्रभाग ५- (अ) काजल गोरख भोसले, (क) हरप्रीतकौर जगजीतसिंग गंभीर, (ड) मोहित प्रदीप पंजाबी, प्रभाग ८- (अ) सुनीता किसन भिंगारदिवे (क) कुमार बबनराव वाकळे, (ड) बाबासाहेब संतराम नागरगोजे, प्रभाग ९- (अ) किरण रमेश दाभाडे, (क) सीमा युवराज शिंदे, प्रभाग ११- (अ) सागर किरण शिंदे, (क) आशा किशोर डागवाले, प्रभाग १२- (अ) आरती संग्राम रासकर, (ब) संध्या रमेश घोलप, प्रभाग १३- (अ) सुरेश लक्ष्मण बनसोडे, (ब) सुजाता महेंद्र पडोळे, (क) अनिता विपुल शेटीया, (ड) अविनाश हरिभाऊ घुले, प्रभाग १४- (अ) प्रकाश बाबूराव भागानगरे, (ब) सुनीता भगवान फुलसौंदर, (क) मीना संजय चोपडा, (ड) गणेश पुंडलिक भोसले, प्रभाग १५- (अ) पौर्णिमा विजय गव्हाळे, (क) गीतांजली सुनील काळे, प्रभाग १६- (अ) सुनीता महेंद्र कांबळे, (ब) वर्षा सुजित काकडे, प्रभाग १७- (अ) मयूर कनैयालाल बांगरे, (ब) अश्विनी सुमीत लोंढे.

भाजपमधील नाराज, राष्ट्रवादीतील बंडखोरांना शिवसेनेत स्थान

५४ जागी लढणार

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : स्वबळाचा नारा देणाऱ्या शिवसेनेने (शिंदे गट) महापालिका निवडणुकीत ५४ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. त्यात विद्यमान २४ नगरसेवक किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या समावेश आहे. भाजपमधील तिकीट वाटपाच्या नाराजीचा फायदा शिवसेनेला झाला आहे. तिकीट कापलेल्या भाजपमधील निष्ठावंतांनी शिवसेनेची वाट धरली आहे. शिवसेनेनेही त्यांना उमेदवारी बहाल केली आहे. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसमधील (अजित पवार) दोघा बंडखोरांनाही शिवसेनेच्या यादीत स्थान मिळाले आहे. मुस्लिमबहुल प्रभागात शिवसेनेने उमेदवारी देणे टाळले आहे.

शिवसेनेच्या उमेदवारांची जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी प्रसिद्धीस दिलेली यादी पुढीलप्रमाणेः प्रभाग १- अश्विनी विलास सांगळे (सर्वसाधारण महिला), प्रताप गडाख (सर्वसाधारण), प्रभाग २- उषा मंगेश भिंगारदिवे (अ. जा. महिला), प्रवीण कैलास मेरगु (नामाप्र), प्रशांत अशोक पाटील (सर्वसाधारण) प्रभाग ३- चंद्रकांत सूर्यभान शेळके (नामाप्र), संगीता रत्नाकर खरमाळे (सर्वसाधारण महिला), स्वप्नजा विजय वाखुरे (सर्वसाधारण महिला), नितीन शिवाजी शेलार (सर्वसाधारण). प्रभाग ५- शीतल रामभाऊ वडागळे (अ. जा. महिला), धनश्री सागर जाधव (सर्वसाधारण महिला), सचिन तुकाराम जाधव (सर्वसाधारण), प्रभाग ६- अमित दत्तात्रय खामकर (नामाप्र), अवंती चेतन शिरसुल (सर्वसाधारण महिला), शांता दशरथ शिंदे (सर्वसाधारण महिला), विशाल शितोळे (सर्वसाधारण).

प्रभाग ७- धनंजय पोपट गोलवड (अनुसूचित जाती), श्रद्धा रवींद्र वाकळे (नामाप्र महिला), सारिका हनुमंत भुतकर (सर्वसाधारण महिला), गोरख अर्जुनराव बोरुडे (सर्वसाधारण), प्रभाग ८- प्रियंका मनोज प्रभुणे (अ. जा. महिला), पूनम अतुल लगड (नामाप्र महिला), नवनाथ मच्छिंद्र कातोरे (सर्वसाधारण), राहुल लक्ष्मण कातोरे (सर्वसाधारण), प्रभाग ९- संजय छगनराव शेंडगे (अनुसूचित जाती), रुपाली संदीप दातरंगे (नामाप्र महिला), श्याम वैशाली नळकांडे (सर्वसाधारण महिला), सचिन चंद्रशेखर शिंदे (सर्वसाधारण) प्रभाग १०- अश्विनी सचिन जाधव (सर्वसाधारण महिला), सचिन तुकाराम जाधव (सर्वसाधारण), प्रभाग ११- उमेश (गणेश) कवडे (नामाप्र), वैष्णवी सतीश कवडे (सर्वसाधारण महिला), सुनीता संतोष गेनप्पा (सर्वसाधारण महिला), नरेंद्र कुलकर्णी (सर्वसाधारण)

प्रभाग १२-मंगल सुनील लोखंडे (नामाप्र महिला), सुरेखा संभाजी कदम (सर्वसाधारण महिला), बाळासाहेब बोराटे (सर्वसाधारण), दत्ता कावरे (सर्वसाधारण), प्रभाग १३- अभिजित मिलिंद भिंगारदिवे (अनुसूचित जाती), निर्मला कैलास गिरवले (सर्वसाधारण महिला), प्रभाग १४-ऋषीकेश विजय रासकर (नामाप्र), ऋतिका हरीश भांबरे (सर्वसाधारण महिला), दिलीप विठ्ठल झिंजुर्डे (सर्वसाधारण), प्रभाग १५- प्रियंका परसराम गायकवाड (अ. जा. महिला), सुवर्णा दत्ता जाधव (नामाप्र), विद्या दीपक खैरे (सर्वसाधारण महिला), अनिल शिंदे (सर्वसाधारण), प्रभाग १६- मंगल रावसाहेब तेलोरे (अ. जा. महिला), सुनीता संजय कोतकर (नामाप्र महिला), ओंकार कोतकर (सर्वसाधारण), हर्षवर्धन कोतकर (सर्वसाधारण), प्रभाग १७- अण्णासाहेब शिंदे (अनुसूचित जाती), गौरी गणेश ननवरे (नामाप्र महिला), मनीषा सोपान कारखिले (सर्वसाधारण महिला).

भाजपचे पाच निष्ठावंत

- भाजपने उमेदवारी नाकारलेले व शिवसेनेने उमेदवारी दिलेले- नितीन शेलार, संगीता खरमाळे, स्वप्नजा वाखुरे (प्रभाग ३), नरेंद्र कुलकर्णी (प्रभाग ११), निर्मला कैलास गिरवले (प्रभाग १३).
- शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन जाधव यांनी प्रभाग १० व प्रभाग ५ मधून, तर त्यांची पत्नी अश्विनी जाधव यांनी प्रभाग १० मधून उमेदवारी दाखल केली.
- राष्ट्रवादी ओबीसी सेलचे शहराध्यक्ष अमित खामकर यांना शिवसेनेकडून प्रभाग ६ मधून उमेदवारी.

पोलीस संरक्षणात उमेदवारीअर्ज

मूळचे भाजपचे परंतु आता शिवसेनेकडून उमेदवारी करणारे नरेंद्र कुलकर्णी यांना पोलीस संरक्षणात उमेदवारीअर्ज दाखल करावा लागला. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केल्यानंतर संरक्षण देण्यात आले. त्यांनी सांगितले, की आपण उमेदवारीअर्ज दाखल करण्यासाठी निघालो असताना, विरोधी मोठा जमाव आडकाठी करू लागला होता. त्यामुळे आपण पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून संरक्षण मागितले. त्यानंतर अर्ज दाखल केला.

ग्रामपंचायत माथणी- बाळेवाडी तालुका जिल्हा अहिल्यानगर

जाहिर निविदांतर्गत खुली निविदा सूचना क्रमांक ०३/२०२५-२६ (जावक क्रमांक ग्रामपंचायत/माथणी- बाळेवाडी दि. ३०.१२.२०२५.) सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माथणी- बाळेवाडी तालुका जिल्हा अहिल्यानगर हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा मागवित आहोत.

अ.क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाजित किंमत	बयाणा रक्कम	कामपुर्ण करणेची मुदत	निविदा संच किंमत	निविदा विक्री / स्विकृती कालावधी	ठेकेदाराचा वर्ग
१	constructing Samajmandir in Mathani Gavthan at Mathani Balewadi	अनु जाती नवबौद्ध घटक वस्ती विकास करणे	५७२७५४	५७२८	६ महिने	रु ५९०/-	दिनाक ३१.१२.२०२५ ते दिनांक ०७.०१.२०२६ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून ०८ दिवस	सुशिक्षित बेरोजगार
२	Constructing Cement Concrate Road in Balawadi Gavthan at Mathani Balewadi		३१५१५०	३१५२	६ महिने	रु ५९०/-		मजुर सहकारी संस्था

१.निविदा विक्री, स्विकृती व कामाच्या अटी व शर्तीची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) पहावयास मिळतील. **२.** निविदा उघडण्याचा संभाव्य दिनांक ०८.०१.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत माथणी- बाळेवाडी तालुका जिल्हा अहिल्यानगर येथे होईल. **३.**निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स, पॅन कार्ड झेरॉक्स, जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स, व कागदपत्रे पडताळणी बाबत विहित ३ नमुन्यात रु १००/-च्या मुद्रांकावर घोषणापत्र जोडून दयावे व बयाणा रक्कमेचा डी. डी सरपंच ग्रामपंचायत माथणी बाळेवाडी यांचे नावे देय असावा. तसेच इतर कागदपत्रे स्वयं साक्षांकित करून तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफ्यात टाकावीत. **४.** निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा प्राप्त निविदेपैकी सर्व निविदा कोणतेही कारण न देता ना करण्याचा हक्क निम्न स्वाक्षरी करणारास राखून ठेवला आहे.

सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत माथणी-बाळेवाडी, ता.जि. अहिल्यानगर

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंद. कार्यालय : 09, कम्युनिटी सेंटर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली - 110057.
फोन : 011 49267000, टोल फ्री नं. : 1800 212 8800, ईमेल : customer.care@herohfl.com
वेबसाइट : www.herohousingfinance.com | CIN : U65192DL2016PLC30148
संपर्क पत्ता : ए-6, तिसरा मजला, सेक्टर-4, नोएडा- 201301.

मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 (''नियम'') मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ?क्ट, 2002 ("अधिनियम'') च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एचएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी अधिनियमांतर्गत आणि नियमांमधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत अधिनियमाच्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत खाली नमूद दिनांकास तपशीलवार मागणी सूचना निर्गमित केलेली आहे ज्यात खाली नमूद कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार (सर्वांचा एकत्रित किंवा स्वतंत्र उल्लेख 'बाध्यताधारी' असा करण्यात येईल) / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींना सदर निविदा सूचनेत नमूद रकमांचा भरणा खाली दिलेल्या तपशीलानुसार संबंधित सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सदर सूचनांच्या प्रती नोंदणीकृत पोचदेय टपालाने पाठविण्यात आलेल्या असून त्या निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध आहेत आणि बाध्यताधारी / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींची इच्छा असल्यास ते कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत निम्नस्वाक्षरीकारांकडून संबंधित प्रत प्राप्त करू शकतात. वरील संदर्भात सदर बाध्यताधारी / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींना पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की त्यांनी खाली त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या रकमांचा सदर बाध्यताधारयांनी तयार केलेल्या कर्ज करार व इतर दस्तावेजांसह वाचण्यात येणारया खाली स्तंभ (डी) मध्ये नमूद संबंधित दिनांकांपासून भरणा आणि / किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या पुढील व्याजासह संबंधित सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत एचएचएफएल कडे भरणा करावा. कर्जाच्या परतफेडीच्या हमीदाखल साठी अनामत म्हणून सदर बाध्यताधारयांनी खालील प्रतिभूत मत्ता एचएचएफएल कडे तारण म्हणून ठेवलेल्या आहेत :

कर्ज खाते क्र.	बाध्यताधारी/ कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींचे नाव	खालील दिनांकानुसार एकूण थकबाकी रक्कम (रु.)	मागणी सूचना दिनांक एनपीए दिनांक
HHFAHNHOU22000027188, HHFAHN IPL22000027195, HHFAHNLAP24000050775	मदने बारकू दिलीप, नूतन बारकू मदने	रु. 19,37,384/- दि. 26.12.2025 रोजी नुसार	26.12.2025 04.06.2025

सुरक्षित मालमत्ता / अचल मालमत्ता / तारण मालमत्तांचे वर्णन :- पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, प्लॉट क्र. 255, एकूण मोजमाप क्षेत्रफळ 292.88 चौ.मी., सर्व्हे क्र. 102/1/2A3 (जुना नागापूर सर्व्हे क्र. 112/1 + 2ए+ 3भाग) या प्लॉट क्षेत्रफळ पैकी रो हाऊस क्र. सी (युनिट क्र. 3) मोजमाप 0.51.06 आर चौ/मीटर (51.06 चौ. मीटर) आणि श्री समर्थ रो हाऊसेस फेज-6 च्या तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र आरसीसी मोजमाप 36.466 चौ. मीटर, अहमदनगर तालुका आणि जिल्हा नवनागपूर येथे स्थित- व्यवहार, भोगवटा, रस्त्याचे हक्क आणि त्यापैकी काही संबंधित खरेदी करार राखून ठेवलेले नाहीत. पूर्व-पश्चिम लांबीची भिंत दोन्ही युनिटधारकांच्या संयुक्त मालकी आणि भोगवटामध्ये राहील. चतुःसीमा : पूर्वः 9 मीटर रुंद रस्ता, दक्षिणः रो हाऊस क्र. बी (युनिट क्र. 2), पश्चिमः एस. क्र. 113, उत्तरः रो हाऊस क्र. डी (युनिट क्र. 4).

*भरण्याच्या व / किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या वर नमूद दिनांकाच्या मागणी सूचनेत दिलेल्या दराने पुढील व्याज, अतिरिक्त व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्क, अधिभार इ. सह. सदर बाध्यताधारी वर दिल्यानुसार एचएचएफएल कडे भरणा करण्यात असमर्थ ठरल्यास एचएचएफएल द्वारे सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत सुरक्षित मत्ता / अचल मालमत्तांविरुद्ध कारवाई सुरु करण्यात येईल व त्यासाठी होणारया खर्च व परिणामांसाठी सर्वस्वी सदर बाध्यताधारी / वारसदार / कायदेशीर प्रतिनिधी जबाबदार असतील.

सदर अधिनियमांतर्गत सदर बाध्यताधारी / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींना एचएचएफएल च्या लेखी पूर्व परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टी किंवा अन्य कोणत्याही प्रकारे वर नमूद सुरक्षित मत्ता / अचल मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर अधिनियमातील किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमधील तरतुदींचे उल्लंघन करणारया किंवा उल्लंघन करण्यास चिथावणारया व्यक्तीस सदर अधिनियमांतर्गत तरतूद केल्याप्रमाणे तुरुंगवास व / किंवा दंड होऊ शकतो.

दिनांक : 31.12.2025,
ठिकाण : अहमदनगर

स्वा./- प्राधिकृत अधिकारी,
हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता

प्रपत्र जी
स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रण

क्वाड्रंट टेलिवेंचर्स लिमिटेड

पंजाब राज्य व लगतचे क्षेत्र येथे टेलिकम्युनिकेशन ॲण्ड ब्रॉडबॅन्ड सर्व्हिसेसमध्ये कार्यरत

[भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींना नादार ठरविण्याची प्रक्रिया) नियम, २०१६ मधील नियम ३६ए(१) अंतर्गत]

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट देणेकऱ्याचे नाव तसेच PAN/CIN/LLP क्र.	**क्वाड्रंट टेलिवेंचर्स लिमिटेड** CIN: L00000MH1946PLC197474 PAN: AABCT2862R
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	**नोंदणीकृत कार्यालय :** सदनिका क्र. ८, बी-टाइप, सदाफुली बिल्डिंग, तिरूपति पार्क, गुरुसाहनीनगर, एन-४, सिडको, औरंगाबाद शहर, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत-४३१००१ **कॉर्पोरेट कार्यालय :** बी-७१, इंडस्ट्रियल एरिया, फेज-VII, मोहाली, पंजाब, भारत-१६००५५
३.	वेबसाइटचा यूआरएल	https://www.connectbroadband.in/
४.	बहुतेक स्थिर मत्ता जेथे स्थित आहेत त्या ठिकाणांचे तपशील	कॉर्पोरेट देणेकऱ्याच्या बहुतेक स्थित मत्ता पंजाब व लगतच्या क्षेत्रात आहेत
५.	मुख्य उत्पादने/ सेवांची क्षमता	लागू नाही
६.	मागील आर्थिक वर्षात विक्री करण्यात आलेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे प्रमाण व मूल्य	कॉर्पोरेट देणेकऱ्याने नोंद केलेला शेवटचा उपलब्ध वित्तीय अहवाल २०२४-२५ या आर्थिक वर्षामधील एकूण महसूल आहे रु. २७३.९७ कोटी इतका आहे. त्यापुढे कंपनीचे समभाग बीएसई कडे सूचीबद्ध आहेत.
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	३०.११.२०२५ रोजी ९६५ ऑनरोल आहेत व २३२ बाह्यकंत्राट पद्धतीने कार्यरत आहेत
८.	दोन वर्षांची शेवटची उपलब्ध असलेली वित्तीय विवरणे (वेळापत्रकासह), घेणेकऱ्यांच्या याद्या, पुढील प्रक्रियांसाठी संबंधित दिनांकांसह अधिक तपशील येथे उपलब्ध आहे	https://www.connectbroadband.in/ येथे किंवा निराकरण व्यावसायिक यांना qtl.ibc@gmail.com येथे विनंती पाठवून प्राप्त करता येईल.
९.	संहितेच्या अनुच्छेद २५(२)(एच) अंतर्गत ठराव अर्जदारांसाठी अर्हता येथे उपलब्ध आहेत :	https://www.connectbroadband.in/येथे किंवा निराकरण व्यावसायिक यांना qtl.ibc@gmail.com येथे विनंती पाठवून प्राप्त करता येईल.
१०.	स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक :	१५.०१.२०२६ (१७.१२.२०२५ पासून विस्तारीत)
११.	संभाव्य ठराव अर्जदारांसाठी हंगामी यादी जारी करण्याचा शेवटचा दिनांक	२५.०१.२०२६ (२७.१२.२०२५ पासून विस्तारीत)
१२.	हंगामी यादीवरील आक्षेप सादर करण्याचा शेवटचा दिनांक	३०.०१.२०२६ (०१.०१.२०२६ पासून विस्तारीत)
१३.	संभाव्य निराकरण अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याचा दिनांक	०९.०२.२०२६ (११.०१.२०२६ पासून विस्तारीत)
१४.	संभाव्य निराकरण अर्जदारांना माहिती निवेदन, मूल्यांकन सारणी आणि विनंती जारी करण्याचा दिनांक	१४.०२.२०२६ (१६.०१.२०२६ पासून विस्तारीत)
१५.	निराकरण योजना सादर करण्याचा शेवटचा दिनांक	१६.०३.२०२६ (१६.०२.२०२६ पासून विस्तारीत)
१६.	स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी	qtl.ibc@gmail.com
१७.	एमएसएमई म्हणून नोंदणी झाल्याचा कॉर्पोरेट देणेकऱ्याचा तपशील	कॉर्पोरेट देणेकरी एमएसएमई म्हणून नोंदणीकृत नाही.

स्वा/-
अतुल कुमार कंसाल
क्वाड्रंट टेलिवेंचर्स लिमिटेड यांचेकरिता निराकरण व्यावसायिक
नोंदणी क्रमांक : IBBI/IPA-001/IP-P00035/2016-2017/10088,
नोंदणीकृत पत्ता : युनिट क्र. ४३९, टॉवर-बी, स्पेसेज, सोहना रोड, सेक्टर-४७, गुडगाव- १२२०१८ (हरयाणा)
संपर्कासाठी ईमेल : qtl.ibc@gmail.com

दिनांक : ३१.१२.२०२५
आयबीबीआय यांच्याकडे नोंदणीकृत असलेला ईमेल : advatulkansal@gmail.com

---

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : 6वा मजला, बी- बिल्डिंग, गंगा ट्रुएनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र - 411014.
शाखा ऑफ युनिट : तिसरा मजला, ऑफिस क्र. 301, बिझनेस सेंटर, प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, फायनल प्लॉट क्र. 125+126/64, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

ई-लिलाव - विक्री सूचना

सर्फेसी कायद्याअंतर्गत सुरक्षित स्थावर मत्तेची विक्री

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील **नियम 8 आणि 9 सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, 2002 ("कायदा") अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता हि गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे कायद्यानुसार "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित) यांच्याकडे तारण ठेवलेली असून, ज्याचा ताबा सुरक्षित धनको यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 13(2) अन्वये दिलेल्या सूचनेनुसार सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमाच्या नियम 8 आणि 9 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून घेतला आहे.

सुरक्षित मालमत्तेची विक्री ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर ई-लिलावाद्वारे दि. 31-01-2026 रोजी केली जाईल. याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, आम्ही https://www.bankeauctions.com या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जाहीर लिलाव आयोजित करणार आहोत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया जीएचएफएल / सुरक्षित धनको यांच्या वेबसाइटवर दिलेली लिंक म्हणजे www.grihumhousing.com चा संदर्भ घ्या.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना दिनांक व थकित रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (ई)	इरठे (राखीव किंमतीच्या 10%) (एफ)	इरठे सादरीकरणाची दिनांक (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्तेच्या पाहणीची दिनांक व वेळ (आय)	लिलावाची दिनांक व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के)
1	**कर्ज क्र. HL00594100000005015200 अतुल हनुमंतराव चाटे (कर्जदार), रजनी रावसाहेब कातकडे (सह-कर्जदार)**	**सूचना दिनांक : 10-09-2025 एकूण देय : रु. 1551471/-** (रुपये पंधरा लाख एक्कावन्न हजार चारशे एक्काहत्तर फक्त) दि. 10-09-2025 रोजी नुसार देय, सोबत पेमेंट देईपर्यंतचे 10.70% वार्षिक दराने व्याज.	प्रत्यक्ष	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, स्टिल्ट दुसरा मजला फ्लॅट क्र. 11 त्याचे बिल्ट अप मोजमाप क्षेत्रफळ 26.54 चौ. मी., बाल्कनी मोजमाप क्षेत्रफळ 9.5 चौ. मी., जिना मोजमाप क्षेत्रफळ 2.5 त्याचे एकूण विक्रीयोग्य मोजमाप क्षेत्रफळ 48.8 चौ. मी. साई चैतन्य रेसिडेन्सी फेज II पैकी, सर्व्हे क्र. 213/1/2ए/2बी/1/2 (जुना सर्व्हे क्र. 213/1/2ए/2बी1/2बी2) पैकी जे प्लॉट क्र. 6 त्याचे एकूण मोजमाप क्षेत्रफळ 337.12 चौ. मी. यावर रीतसर बांधलेले, केडगाव येथे स्थित, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर च्या हद्दीत, ता. नगर जिल्हा अहमदनगर आणि **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- पूर्वेकडे :** 12 मी. रस्ता, **दक्षिणेकडे :** फ्लॅट क्र. 12, **पश्चिमेकडे :** डक्ट आणि सदनिका क्र. 10, **उत्तरेकडे :** प्लॉट क्र. 5 मोजमाप क्षेत्रफळ - मोजमाप क्षेत्रफळ 48.8 चौ. मी.	रु. 1431002/- (रुपये चौदा लाख एकतीस हजार दोन फक्त)	रु. 143100.20/- (रुपये एक लाख त्रेचाळीस हजार शंभर आणि वीस पैसे फक्त)	**30-01-2026 रोजी सायं. 5 वा. पूर्वी**	10,000/-	**27-01-2026 (स. 11 - दु. 4)**	**31-01-2026 (स. 11 - दु. 2)**	निरंक

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना सल्ला दिला जात आहे कि, सुरक्षित धनको शाखा आणि लिलाव मालमत्तेला भेट द्यावी आणि स्वतःची चौकशी करावी आणि बोली सादर करण्यापूर्वी आणि अतिरिक्त शुल्क, बोजा आणि कोणत्याही तृतीय-पक्षाच्या हितसंबंधांची खात्री करून घेणे आणि त्याच्या सर्व पैलूंमध्ये स्वतःचे / स्वतः समाधान करून घ्यावे. सर्व वैधानिक देय जसे की मालमत्ता कर, वीज / पाणी देय आणि इतर कोणतीही देयके, जर असतील तर, निश्चित केली जावीत आणि ती यशस्वी बोलीदाराने भरावीत.

इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे आणि लिलाव सेवा प्रदाता - सी1 इंडिया प्रा. लि. यांच्याकडून लॉगिन आयडी आणि पासवर्ड आधीच प्राप्त करणे आवश्यक आहे, जे ई-बिडिंगसाठी अनिवार्य असणार आहे - सी1 इंडिया प्रा. लि., पत्ता- प्लॉट क्र. - 68, तिसरा मजला, गुडगाव हरियाणा- 122003. हेल्पलाइन क्रमांक - 7291981124, 25, 26 सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com. संपर्क व्यक्ती - धरनी पी, ईमेल आयडी- **dharani.p@c1india.com संपर्क क्र. 9948182222.** कृपया लक्षात घ्या की संभाव्य बोलीदार केवळ त्यांच्याकडूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. इच्छुक खरेदीदार / बोलीदार यांनी बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड - लिलाव प्रक्रिया खाते" च्या खात्यात, बँक- आयसीआयसीआय बँक लि. खाते क्रमांक - 091551000028 आणि आयएफएससी कोड- ICIC0000915, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, पंचशील टेक पार्क, गणपती चौकाजवळ, 43/44 विमान नगर - 411014 येथे **कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेवरील काढलेले एनईएफटी / आरटीजीएस / डीडी द्वारे दि. 30/01/2026 रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे आणि त्यांची नावे https://www.bankeauctions.com** वर नोंदवा आणि युजर आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवा तसेच सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण घ्या. वेबसाइटवर त्यांची नोंदणी केल्यानंतर, इच्छुक खरेदीदार / बोलीदार यांनी खालील कागदपत्रांच्या प्रती ई-मेलवर अपलोड करणे आणि खालील पत्त्यावर स्व-साक्षांकित हार्ड कॉपी पाठवणे आवश्यक आहे : तिसरा मजला, ऑफिस क्र. 301, बिझनेस सेंटर, प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, फायनल प्लॉट क्र. 125+126/64, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003, मोबाईल क्र. +91 8281138143 ई-मेल आयडी : **p.adith@grihumhousing.com.** ई-लिलावात भाग घेण्यासाठी अटी आणि शर्तीच्या अधिक तपशीलांसाठी कृपया **https://www.bankeauctions.com** आणि **www.grihumhousing.com** ला भेट द्या.

हि सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांना 30 दिवसांची सूचना देखील मानण्यात येईल.

कोणत्याही परिस्थितीत स्थानिक भाषेतील प्रकाशन आणि इंग्रजी वृत्तपत्र प्रकाशनातील मजकुरात काही फरक असल्यास, इंडियन एक्सप्रेस मध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी वृत्तपत्र भाषेतील मजकुराला प्राधान्य दिले जाईल.

दिनांक : 31.12.2025 ठिकाण : अहमदनगर
स्वा./- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

श्री वारणा सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालयः मु. वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ४१६११३, फोनः (०२३२८) २४४२८६/८७
शाखा कार्यालयः प्लॉट नं.६, पेट्रोलपंपाजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर - ४१४००३, फोनः (०२४१) २४२४३६५

विक्री नोटीस

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यामधील रुल्स नुसार स्थावर मालमत्ता विक्री बाबत जाहीर नोटीस.

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ८(६) प्रमाणे नोटीस. सदरची नोटीस वरील नियमांअंतर्गत खाली नमुद केलेल्या कर्जदार व इतर यांना ३० दिवसांची नोटीस सुध्दा आहे. खाली सही करणार श्री वारणा सहकारी बँक लि. यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (येथून पुढे सदर कायदा असे वाचावे) अन्वये आपली येणेबाकी वसुलीसाठी सदर कायद्यातील कलम व रुल्स या अन्वये खाली नमुद केलेप्रमाणे तारण मिळकत **'जशी आहे तशी व जिथे आहे तशी'** या तत्वावर खरेदी करण्यास इच्छुक खरेदीदाराकडून विहित नमुन्यातील निविदामधून त्यांचे खरेदी प्रस्ताव मागविले आहेत. ही मालमत्ता सदर कायद्यातील कलम आणि नियम अन्वये बँकेने त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारान्वये आपल्या **प्रत्यक्ष ताब्यात** घेतली आहे.

अ.नं.	कर्जदार व जामिनदारांची नावे	मागणी रक्कम	मिळकतीचा तपशिल	राखिव किंमत
1.	१) मे. ओम पॉलिमर्स प्रोप्रा. श्री.नवनाथ भानुदास कल्हापुरे, रा. मु.पो. वांबुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर (अहिल्यानगर) **(कर्जदार),** २) श्री.किरण ज्ञानदेव कातरे, रा.६०-एस टी कॉलनी, तपोवन रोड, सावेडी, अहमदनगर (अहिल्यानगर) (जामिनदार), ३) श्री. अमित बापुसाहेब हरिश्चंद्रे, रा.मु.पो.ब्राह्मणी, ता. राहुरी, जि. अहमदनगर (अहिल्यानगर) (जामिनदार)	बँकेने कर्जदार व इतर यांना कायदा कलम १३(२) अन्वये ता. ३०/०६/२०२१ रोजी दिलेल्या मागणी नोटीसीमधील ता. ३१/०३/२०२१ अखेर रक्कम रु. ३९,५६,९७२.२० व त्यावर होणारे पुढील व्याज व खर्च आदी सह.	गट नं.६८९/१/१/१, गाव वांबोरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर (अहमदनगर) येथील पश्चिमेकडील ०हे ०५आर या एन.ए. मिळकतीचे मालक प्रोप्रा. श्री.नवनाथ भानुदास कल्हापुरे.	रु.८१,४५,०००/-

विक्री निविदा, अटी व शर्तीसह बँकेच्या प्रधान कार्यालयाच्या वरील पत्त्यावर व बँकेच्या अहिल्यानगर येथील शाखेत उपलब्ध होतील. इच्छुक खरेदीदारांनी मिळकतीसाठी स्वतंत्र निविदा, शर्ती व अटीनुसार निविदा शुल्क आणि बोली रकमेच्या १०% या रकमेच्या अहिल्यानगर येथील डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डरसह सिलबंद लखोट्यातून फ्लॅटनुसार स्वतंत्र आपल्या निविदा द्याव्यात. सदर मिळकतींची पाहणी अहिल्यानगर शाखाधिकारी श्री.संतोष उपरे, मोबा. ९४२१४७९००५ यांच्या पूर्व परवानगीने **दि. २८/०१/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत करता येईल. वरील प्रमाणे निविदा अहिल्यानगर शाखेच्या कार्यालयात **दि. २९.०१.२०२६ अखेर सकाळी ११.००** वाजेपर्यंत स्विकारल्या जातील आणि **दि. २९.०१.२०२६ रोजी दुपारी १.३०** वाजता याच कार्यालयात उघडल्या जातील. **अधिक माहितीसाठी बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांच्याशी मोबा.नं. ९७६३७१६५७१ वर संपर्क साधावा.**

सही
प्राधिकृत अधिकारी
श्री वारणा सहकारी बँक लि.

तारीखः २९/१२/२०२५

(सदरची नोटीस ही मूळ इंग्रजी नोटीसीचा स्वैर अनुवाद असून, तफावत असल्यास इंग्रजी नोटीस ग्राह्य धरणेत येईल.)

चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. चंद्रपुर
प्रमुख कार्यालय, सिव्हील लाईन्स, चंद्रपुर
नागपुर रोड, चंद्रपुर
फोन क्र. 07172-252180

"प्रस्ताव सुचना"

चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. (CDCC) यांच्यावतीने बिड प्रोसेस मॅनेजमेंट/वित्तीय सल्लागारांकडुन खालील कामासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत-

"CDCC मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी बिड प्रोसेस मॅनेजमेंट सल्लागारांची निवड (Empanelment)"

प्रस्ताव खरेदी कालावधी	:	**31/12/2025 ते 07/01/2026**
प्रस्ताव खरेदी ठिकाण	:	**प्रमुख कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपुर रोड, चंद्रपुर**
प्रस्ताव शुल्क	:	**रु.10,000/- (रोख स्वरुपात)**
प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ	:	**07/01/2026 रोज सायं. 05.00 वाजेपर्यंत**

प्रस्तावाच्या सविस्तर अटी व शर्ती तसेच प्रस्ताव दस्तऐवजासाठी चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रमुख कार्यालयात भेट द्यावी.

स्वा/-
(राजेश्वर भि. कल्याणकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING

मॅरेज ब्युरो

सौ. कुळकर्णी विवाहसंस्था- सर्व जातींची उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. ४३ वर्षांची परंपरा. लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव. 'मध्यस्थी' उपलब्ध. फेस्टिव्ह ३०% डिस्काऊंट. 8369692734/ 9892625606.

0070934850-18

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टायझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्यातील आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाने संविदापत्र कार्यान्वित करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.